# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.11.2024** **वार – मंगळवार**

---

**मोदी**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज पुण्यात प्रचार सभा घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर पुण्यात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. स. प. महाविद्यालयाच्या प्रांगणात थोड्याच वेळात पंतप्रधानांची जाहीर सभा असल्याने शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

**कॉंग्रेस प्रचार**

कॉंग्रेसचं राज्य असलेल्या कर्नाटकमध्ये दिलेल्या आश्वासनाप्रमाणे 5 योजना यशस्वीपणे सुरू आहेत. महाराष्ट्रातही दीर्घकालीन विचार करून कॉंग्रेसने कर्नाटकच्या धर्तीवर 5 गॅरंटी योजना आणली असून ती राज्यात यशस्वी होईल असा विश्वास कर्नाटक सरकारचे ऊर्जा मंत्री  के. जे. जॉर्ज यांनी व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जॉर्ज यांनी आज पुण्यात कॉंग्रेस भवन इथं प्रसार माध्यमायांशी संवाद साधला. कॉंग्रेस सरकारने कर्नाटकच्या जनतेला गृह लक्ष्मी, शक्ती, गृह ज्योती, अन्न भाग्य आणि युवा निधी या पाच योजनांची हमी दिली होती. गेल्या दोन वर्षापासून त्या सुरू असून प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला याचा लाभ मिळत असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान शहरात सध्या सर्वच पक्षांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश बागवे यांनी पथविक्रेत्यासाठी काम करणाऱ्या जाणीव संघटनेतील पथविक्रेता, फेरीवाले स्टॉल धारक यांच्याशी संवाद साधला. पथविक्रेता कायदा आणि धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

**मतदान जनजागृती**

विधानसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी निवडणूक यंत्रणा अनेक उपक्रम राबवत आहे. शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात स्वीप अंतर्गत युनियन बँकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना

मतदानाची शपथ देण्यात आली. रेंजहिल्स माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढून मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

**पुलकुंडवार**

वारकरी भाविकांना आणि राज्यातील सर्व जनतेला पांडुरंगाच्या कृपेने सुख समृद्धी आनंद लाभो अशी प्रार्थना पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत फुलकुंडवार यांनी आज पांडुरंगाचरणी केली. पंढरपूर इथं श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा पुलकुंडवार आणि त्यांच्या पत्नी सायली पुलकुंडवर यांच्या हस्ते पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. कार्तिकी एकादशीनिमित्त आज पुण्यातील विविध विठ्ठल मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे.

**मृत्यूदर**

पुण्यात गेल्या तीन वर्षांत मातामृत्यू दरात घट झाल्याचं पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागानं सांगितलं आहे. शहरात 2022मध्ये 35 मातामृत्यू नोंदवले गेले होते. 2023मध्ये 29 आणि यावर्षी एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत 12 मातांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. गर्भधारणेदरम्यान आणि बाळाच्या जन्मादरम्यान उद्भवणारी गुंतागुंत रोखण्यासाठी आरोग्य यंत्रणा प्रयत्नशील असल्याचं आरोग्य विभागानं म्हटलं आहे.

**पोषण परिषद**

पोषण या विषयावरच्या  56 व्या वार्षिक राष्ट्रीय परिषदेचं आयोजन उद्यापासून 15 नोव्हेंबर पर्यंतच्या कालावधीत पुण्यात केलं जाणार आहे. न्यूट्रिशन सोसायटी ऑफ इंडिया आणि सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ  संयुक्तपणे ही परिषद आयोजित करत आहे. कुपोषणाचं प्रमाण कमी करण्यासाठी नाविन्यपूर्ण धोरणे आणि आवश्यक उपाययोजना सुचवण्याच्या दृष्टीनं या परिषदेत विचार मंथन होणार असल्याचं सिंबायोसिस विद्यापीठाच्या पोषण विभागाचे संचालक अतुल गोखले आणि डॉ. सरथ गोपालन यांनी दिली.

**अन्नकोट**

माहेश्वरी चॅरिटेबल फॉउंडेशनतर्फे दरवर्षी दीपावलीमध्ये अन्नकोट महोत्सव साजरा केला जातो. यंदाही हा महोत्सव पार पडला. या महोत्सवात गोवर्धनधारी भगवान श्रीकृष्णाला 56 प्रकारच्या मिठाईचा नैवेद्य दाखवण्यात आला. श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलल्याचा देखावाही सादर करण्यात आला होता.

**हवामान**

पुणे परिसरात सकाळी आणि रात्रीच्या वेळी चांगलीच थंडी जाणवू लागली आहे. आज किमान तापमान 15 अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही शहरात हवामान कोरड राहून किमान तापमान 16 अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. तसच सकाळच्या वेळी धुकं पडण्याची शक्यताही  हवामान विभागानं  वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**